# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-06.05.2026** **वार- बुधवार**

---

**एसटीकार्ड**

एसटीचं नवीन NCMC कार्ड घेणाऱ्या प्रवाशांसाठी 199 रुपये, तर यापूर्वी स्मार्ट कार्ड असलेल्या प्रवाशांसाठी 149 रुपये असा दर निश्चित करण्यात आला आहे. मात्र, काही अधिकृत विक्रेत्यांकडून सवलतधारक प्रवाशांना जादा दराने कार्ड विक्री केल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर, अवाजवी दर आकारणाऱ्या परवानाधारक विक्रेत्यांचे परवाने तत्काळ रद्द करण्यात येतील, असा स्पष्ट इशारा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिला आहे. यानुसार, काही विक्रेत्यांचे परवाने रद्द करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. एसटीच्या वतीनं सवलतधारक प्रवाशांना स्मार्ट कार्डचं वितरण सुरू करण्यात आलं आहे. यासाठी राज्यभरात तीन हजारपेक्षा जास्त अधिकृत विक्रेत्यांची नियुक्ती करण्यात आली असून, प्रत्येक आगार आणि प्रमुख बसस्थानकांवरही ही कार्ड्स उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

**ठराव**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या क्रीडा,कला आणि साहित्य समितीच्या आढावा बैठकीत शहरातील क्रीडा,कला आणि साहित्य क्षेत्राच्या विकासासाठी चार महत्त्वाच्या प्रस्तावांना मान्यता देण्यात आली. शहरातील नागरिक, खेळाडू, कलाकार आणि महिलांच्या सक्षमीकरणासाठी लोकाभिमुख प्रस्ताव सादर करण्यात आले. या निर्णयांमुळं शहरातील खेळाडू, कलाकार आणि नागरिकांना अधिक संधी आणि सुविधा उपलब्ध होतील अशी अपेक्षा आहे.

**परिषद**

पुणे ही भारताची सांस्कृतिक राजधानी व्हावी, या उद्देशानं 'कोहिनूर कट्टा' प्रस्तुत आणि म. सा.प.च्या विशेष सहयोगानं 'मानचित्र सांस्कृतिक पुण्याचे' या निमंत्रितांच्या दोन दिवसीय परिषदेचं उद्घाटन आज संध्याकाळी पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेमध्ये झालं. पुढील अनेक वर्षांचं सांस्कृतिक वेधपत्र अर्थात Vision Document तयार करण्याच्या दृष्टीनं याचं विशेष महत्व आहे. मूर्तीशास्त्राचे गाढे अभ्यासक डॉक्टर गो. बं. देगलूरकर, ज्येष्ठ गायक पंडित संजीव अभ्यंकर, पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, दिग्दर्शक-अभिनेते प्रवीण तरडे यावेळी उपस्थित होते.

**प्रस्ताव**

पुणे महानगरपालिकेच्या मुख्य सभा तसंच विविध समित्यांच्या बैठकीत आयत्यावेळी सादर होणाऱ्या प्रस्तावांबाबत महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी कोणत्याही बैठकीत विषय समाविष्ट करण्यासाठी संबंधित विभागानं किमान एक दिवस अगोदर प्रस्ताव संबंधित अतिरिक्त महापालिका आयुक्तांकडे सादर करणं बंधनकारक केलं आहे.

महापालिकेच्या स्थायी समिती, शहर सुधारणा समिती तसंच इतर विषय समित्यांच्या बैठकींमध्ये अनेकदा विभागप्रमुख आयत्यावेळी प्रस्ताव मांडून त्याला तातडीनं मान्यता द्यावी, अशी मागणी करतात. यामुळं संबंधित विषयांची पुरेशी माहिती उपलब्ध होत नाही. तसंच बैठकीत या प्रस्तावांबाबत समितीच्या सदस्यांनी त्यावर प्रश्न उपस्थित केल्यास आणि अतिरिक्त माहिती मागितल्यास त्यावर सविस्तर चर्चा करणं अडचणीचं ठरतं.

**आरएमसी**

पुणे आणि परिसरात गृहप्रकल्पांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून, त्यासाठी काँक्रीटचा पुरवठा करणारे रेडी मिक्स काँक्रीट प्रकल्पही वाढत आहेत. अनेक ठिकाणी या प्रकल्पांकडून नियमांचे उल्लंघन सुरू असून, त्यामुळं हवा प्रदूषणात मोठी वाढ होत आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळानं गेल्या वर्षीपासून पुणे, पिंपरी-चिंचवडसह ग्रामीण भागातील २५ टक्क्यांहून अधिक आरएमसी प्रकल्पांना टाळं ठोकलं आहे. आरएमसी प्रकल्पांमुळं होत असलेल्या हवा प्रदूषणाचा मुद्दा वारंवार उपस्थित होत आहे. गेल्या वर्षी वाकड परिसरात नागरिकांनी रस्त्यावर उतरून आरएमसी प्रकल्पांच्या विरोधात आंदोलन केल्यानं त्याची तीव्रता समोर आली होती. तसंच, इतरही अनेक ठिकाणी आरएमसी प्रकल्पांमुळं हवा प्रदूषणात वाढ होत असल्याची तक्रारी आहेत. त्यामुळं महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळानं गेल्या वर्षी जानेवारीपासून आरएमसी प्रकल्पांवर कारवाईचं पाऊल उचललं. त्यात आरएमसी प्रकल्पांची तपासणी मोहीम हाती घेण्यात आली. या अंतर्गत आतापर्यंत नियमांचं गंभीर उल्लंघन करणारे ८४ आरएमसी प्रकल्प बंद करण्याची कारवाई करण्यात आली.

**सन्मान**

पिंपरी चिंचवड शहराच्या नावलौकिकात आपल्या कार्यकर्तृत्वानं भर घालणाऱ्या तसंच कला, क्रीडा, सांस्कृतिक आणि साहित्य क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्तीमत्त्वांचा महापालिका सर्वसाधारण सभेत सन्मान करण्याच्या धोरणानुसार काल पत्रकारिता, कला, साहित्य अशा विविध क्षेत्रात ठसा उमटवून शहराच्या नावलौकिकात भर घालणारे मधुकर जोशी यांचा महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेनं मानपत्र देऊन सन्मान केला याचा आनंद आहे, परंतु त्याहून अधिक समाधान या महानगरपालिकेच्या सर्वांगीण प्रगतीकडं पाहून मिळत आहे अशी भावना जोशी यांनी सत्काराला उत्तर देताना व्यक्त केली. आजच्या घडीला अनेक महानगरपालिकांमध्ये कार्यातील समर्पकपणा आणि एकसंधता दिसून येत नाही मात्र इथं ती स्पष्टपणे जाणवते. सुखद आणि सुरक्षित निवास, सुलभ आणि परिणामकारक प्रवास व्यवस्था, आणि आपुलकीचा सहवास या अपेक्षा एक नागरिक म्हणून सर्वांच्या आहेत. या सर्व बाबींमध्ये इथं होत असलेली प्रगती निश्चितच आशादायक आहे, असं मधुकर जोशी म्हणाले.

**बिबट्या**

पिंपरी-चिंचवड परिसरातील अम्युनिशन फॅक्टरी, देहूरोड - दुर्गा देवी टेकडी - रावेत,म्हस्के वस्ती या परिसरात बिबट्याचा वावर असून वनविभाग शोध मोहिम राबवित आहे. नागरिकांनी बिबट्यापासून सावध राहावं असं आवाहन महापालिकेतर्फे करण्यात आलं आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**